आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
रविवार दिनांक ०१ जून २०२५

ठळक बातम्या

1. नाशिकमध्ये सिंहस्थ कुंभमेळयाच्या आयोजनासंदर्भात मुख्यमंत्र्यांनी घेतली आढावा बैठक, तयारीच्या दृष्टीनं ४ हजार कोटी रुपयांच्या निविदा काढल्याची मुख्यमंत्र्यांची माहिती.

2. मान्सूनचा प्रवास रखडल्यानं पेरणीची घाई न करण्याचा कृषी विभागाचा शेतकऱ्यांना सल्ला.

3. गोंदिया जिल्ह्याच्या गोठणगाव येथील सहा वर्षीय मुलगी बिबट्याच्या हल्ल्यात जखमी.

4. आयपीएल क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात स्थान मिळवण्याकरता आज मुंबई इंडियन्स आणि पंजाब किंग्ज यांच्यात दुसरा पात्रता सामना.

सिंहस्थ कुंभमेळा-मुख्यमंत्री आढावा बैठक

त्र्यंबकेश्वर नाशिकमधल्या सिंहस्थ कुंभमेळयाच्या आयोजनासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नाशिक इथं १३ प्रमुख आखाड्यांचे महंत, साधुसंत, सर्व प्रमुख पुरोहित संघाचे प्रतिनिधी यांच्यासोबत आढावा बैठक घेतली. कुंभमेळयाच्या आयोजनाच्या दृष्टीनं करायच्या कामांसाठी ४ हजार कोटी रुपयांच्या निविदा काढल्या आहेत, त्यापैकी काही अंतिम टप्प्यात आहेत, तसंच आणखी २ हजार कोटी रुपयांच्या निविदा काढणार असल्याचं त्यांनी या बैठकीनंतर बातमीदारांशी बोलताना सांगितलं. कुंभमेळयाच्या अनुषंगानं गोदावरी नदीच्या स्वच्छतेसाठी तसंच नदी वाहती राहण्यासाठी विशेष कामं केली जाणार असल्याचं ते म्हणाले. यंदाचा कुंभमेळा दीर्घकाळ चालणार असून, एकाच तारखेला गर्दी होणार नाही किंवा गर्दीमुळे कोणती दुर्घटना होणार नाही, अशाप्रकारे नियोजन केलं जाणार आहे. कुंभमेळयाच्या अमृतस्नानाच्या तारखा लवकरच जाहीर केल्या जातील, असंही ते म्हणाले.

कृषी विभागाचा सल्ला

बदललेल्या वातावरणामुळं मान्सूनचा प्रवास सध्या रखडलेला असून, १० जूनपर्यंत राज्यात पावसाचं प्रमाण कमीच राहणार आहे. अशा परिस्थितीत कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवून पेरणीची घाई करू नये, असा सल्ला कृषी विभागानं विशेषतः कोरडवाहू शेतकऱ्यांना दिला आहे. किमान १० जूनपर्यंत राज्यात बहुतांश भागात हवामान कोरडं राहणार आहे. यामुळे तापमानात वाढ होणार असून, विदर्भात तापमान ४० अंशांपर्यंत जाण्याची शक्यता

आहे. या कोरड्या हवामानाचा वाईट परिणाम पेरणी आणि लागवडीवर पडण्याची शक्यता आहे.

सर्वपक्षीय शिष्टमंडळ

दहशतवादाविरुद्ध शून्य सहिष्णूतेचा भारताचा संदेश जगभरात पोहोचवण्यासाठी विविध देशांमध्ये गेलेल्या बहुपक्षीय शिष्टमंडळांपैकी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखालचं शिष्टमंडळ इथिओपिया इथं पोहोचलं आहे. या प्रतिनिधिमंडळानं इथिओपिया मधले संसद प्रतिनिधी, मान्यवर व्यक्ती आणि आफ्रिकी संघ आयोगाच्या सदस्यांची भेट घेतली. भारताला नियंत्रणरेषेच्या पलीकडून असलेला दहशतवादाचा धोका आणि देशात सांप्रदायिक सलोखा बिघडवण्याच्या पाकिस्तानच्या प्रयत्नांची माहिती शिष्टमंडळाने त्यांना दिली. भाजपा नेते रविशंकर प्रसाद यांच्या नेतृत्वाखालचं शिष्टमंडळ फ्रांस, इटली आणि डेन्मार्कचा दौरा आटोपून लंडनला पोहोचलं आहे. भारत आपली भूमिका परिणामकारकपणे मांडेल आणि इतर तीन देशांप्रमाणेच लंडनमध्ये देखील भारताच्या भूमिकेला पाठिंबा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. याशिवाय भाजप खासदार बैजयंत पांडा यांचं शिष्टमंडळ सध्या अल्जेरियाच्या दौऱ्यावर असून त्यांनी तिथल्या भारतीय समुदायाशी संवाद साधला, तर द्रमुकच्या खासदार कनिमोळी यांच्या नेतृत्वाखालचं शिष्टमंडळ स्पेनमधल्या माद्रिद इथं पोहोचलं आहे.

जागतिक दूध दिवस

लाखो लोकांच्या उपजीविकेचा स्रोत तसंच जागतिक अन्न म्हणून दुधाचं महत्त्व अधोरेखित करण्यासाठी आज जागतिक दूध दिवस साजरा होत आहे. जागतिक पातळीवर दुधाचं उत्पादन दोन टक्क्यांनी वाढलं . पण भारतात वाढीचं प्रमाण ५ पूर्णांक ७ दशांश टक्के आहे. त्यामुळे जगातला सर्वात जास्त दूध उत्पादन करणारा देश म्हणून भारत ओळखला जातो. दरवर्षी दोन कोटी ३९ लाख लीटर दुधाचं उत्पादन भारतात होतं. देशात सर्वात जास्त उत्पादन गुजरातमधे ७ पूर्णांक ५ दशांश टक्के इतकं होतं.

बिबट हल्ला

गोंदिया जिल्ह्याच्या अर्जुनी/मोरगाव तालुक्यातील गोठणगाव येथील एका सहा वर्षीय मुलीवर बिबट्याने हल्ला करत तिला जखमी केल्याची घटना घडली आहे. रात्री 8 वाजताच्या सुमारास अंगणात उभी असताना बिबट्याने हल्ला करून तिला जखमी केले.दरम्यान, मुलीचा किंचाळण्याचा आवाज येताच, तिच्या घरचे आणि शेजारचे लोक धावून आल्याने मोठा अनर्थ टळला. मुलीच्या मानेवर आणि डोक्यावर बिबट्याची नखे खोलवर रुतल्याने बराच रक्तस्राव झाला. या मुलीला उपचारासाठी अर्जुनी/मोरगाव

ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले. ती सध्या सुखरूप असून तिच्यावर उपचार सुरू आहेत.

<u>रानटी हत्ती</u>

चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पामध्ये मागील काही दिवसांपासून गडचिरोली जिल्ह्यातून चंद्रपूर जिल्ह्यातल्या जंगलात दाखल झालेल्या दोन रानटी हत्तींचा उपद्रव वाढला आहे. या हत्तींनी ताडोबातील बफर परिसरातल्या घनदाट जंगलातून आता डोनी गावानजीक प्रकल्पाच्या कोअर क्षेत्रात प्रवेश केला आहे. दोन दिवसांपूर्वी सिंदेवाही तालुक्यातल्या कुकडहेटी परिसरात रानटी हत्तींनी प्रवेश केल्यानंतर एकच गोंधळ उडाला होता. आता हे हत्ती वेगाने पुढे, ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील कोर क्षेत्राकडे मार्गक्रमण करत आहेत. या हत्तीवर पाळत ठेवण्यासाठी वनविभागाने २५ वन कर्मचाऱ्याचं एक पथक तयार केले असून पथकाच्या वतीने २४ तास पाळत ठेवली जात आहे. याबाबत माहिती देत आहेत ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प बफर क्षेत्राचे उपसंचालक कुशाग्र पाठक-

*और तब से, कल से ही 24/7 मॉनीटरिंग चल रही है। रात में भी मॉनीटरिंग कर रहे है हम तो ऐसा कर रहे है की अपने स्टाफ को भी खतरा ना हो, और हम इस गांव वालों को तुरंत इतला कर पाए और क्राउड कंट्रोल के लिए। क्योंकि जबतक अगर हम लोग हाथी को हैरान नहीं करेंगे, जैसे वो हाथी हमको कोई डॅमेज वगैरह या अटैक वगैरह नहीं करेंगे, तो हम चाहते है की ऐसा कोई हादसा न हो तो पूरी अवेयरनेस जेनरेशन और लोकल जो डिपार्टमेंट है उनके साथ कोऑर्डीनेशन के साथ हमारा स्टाफ इस वक्त काम कर रहा है।*

परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी स्थानिक पोलिस प्रशासन आणि जिल्हा प्रशासनाची मदत घेतली जात आहे. सध्या पर्यटन बंदी झाली नसली, तरी काही भागात सतर्कता म्हणून प्रवेश बंदी करण्यात आली आहे.

<u>वन परिषद</u>

महाराष्ट्र राज्य वन विभागाद्वारे 'वनक्षेत्रातील महिला' या विषयावर चंद्रपूर वन प्रशासन विकास आणि व्यवस्थापन प्रबोधिनी इथं येत्या ५ आणि ६ जून रोजी 'वनशक्ती २०२५' या वनक्षेत्रातील महिलांच्या राष्ट्रीय परिषदेचं आयोजन करण्यात आलं आहे. या दोन दिवसीय परिषदेमध्ये देशाच्या विविध भागांमधील वन क्षेत्रात कार्यरत महिला चर्चासत्रात उपस्थित राहतील. ५ जून रोजी पर्यावरण दिवसाच्या सकाळी १०.३० वाजता वन मंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते परिषदेचं उद्घाटन होईल. या परिषदेचं उद्दिष्ट महिलांच्या वनक्षेत्रातील

अनुभवांची देवाण-घेवाण, नेतृत्वातील अडचणींची चर्चा आणि वनक्षेत्रात महिलांच्या सहभागासाठी धोरणात्मक मार्गदर्शन तयार करणे हा आहे.

<u>जनसंवाद</u>

राज्य शासनाकडून समाजातील सर्व घटकांसाठी विविध योजना राबविण्यात येतात. प्रशासनाने योग्य आणि प्रभावी अंमलबजावणीतून त्यांचा पात्र नागरिकांना लाभ देतांना त्यांच्या या संदर्भातील समस्याही तत्परतेने सोडवाव्यात, असे आदेश महसूल मंत्री तथा नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जनसंवाद कार्यक्रमात अधिकाऱ्यांना दिले. सदरच्या नियोजन भवनात आयोजित या कार्यक्रमात एकूण 207 नागरिकांनी आपल्या समस्या आणि निवेदने सादर केली. प्रशासनातील विविध विभागप्रमुख यावेळी उपस्थित होते. विशेषतः आरोग्यविषयक समस्यांवर आज प्राप्त झालेल्या निवेदनांवर तातडीने कार्यवाही करण्याबाबत बावनकुळे यांनी सांगितले.

<u>आयपीएल</u>

आयपीएल टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात स्थान मिळवण्याकरता आज मुंबई इंडियन्स आणि पंजाब किंग्ज्स यांच्यात दुसरा पात्रता सामना अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडीअम इथं आज संध्याकाळी साडेसात वाजता सुरू होईल. या दुसऱ्या पात्रता सामन्यात प्रवेश मिळवण्यासाठी गुणतालिकेत तिसऱ्या आणि चौथ्या क्रमांकावर असलेल्या मुंबई इंडियन्स आणि गुजरात टायटन्समध्ये झालेल्या निर्णायक सामन्यात मुंबईनं गुजरातचा पराभव केला होता. आता स्पर्धेच्या विजेतेपदासाठी आजच्या सामन्यातला विजेता संघ आणि बंगळुरू यांच्यात येत्या ३ जूनला अहमदाबाद इथं अंतिम लढत होईल.

<u>नागालँड</u>

राष्ट्रवादी काँग्रेसचे (एनसीपी) नागालँडमधील सर्व सात आमदार शनिवारी सत्ताधारी नॅशनलिस्ट डेमोक्रॅटिक प्रोग्रेसिव्ह पार्टी - एनडीपीपीत सामील झाले. ज्यामुळे मुख्यमंत्री नेफ्यू रिओ यांच्या नेतृत्वाखालील पक्षाला 60 सदस्यांच्या विधानसभेत पूर्ण बहुमत मिळाले आहे. या विलीनीकरणामुळे सत्ताधारी आमदारांची संख्या 25 वरून 32 झाली आहे. अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस हा नागालँडमध्ये मुख्य आणि मोठा विरोधी पक्ष होता. आता हे आमदार सत्ताधारी पक्षात गेल्याने सरकारला कुठलाही धोका उरलेला नाही.

## आंतर सेवा सुरक्षा सराव

सुरक्षेसंदर्भातली नवनवीन आव्हानं आणि सज्जतेच्या दृष्टीनं मुंबईत कुलाबा इथल्या सैनिकी प्रशिक्षण केंद्रात एक उच्चस्तरीय संयुक्त आंतर सेवा सुरक्षा सराव आयोजित करण्यात आला होता. या दोन दिवसीय सरावात लष्कर, नौदल, हवाई दल, भारतीय तटरक्षक दल, फोर्स वन पथकाचे जवान आणि राज्य पोलीस दल सहभागी झाले होते. सुरक्षा दलांमध्ये योग्य समन्वय राखणं आणि सदैव दक्ष राहून विविध स्तरावरच्या संभाव्य धोक्यांना वेळीच प्रत्युत्तर देण्याचं प्रशिक्षण देणं, हा या सरावाचा उद्देश होता.

## छत्रपती शिवाजी महाराज सर्किट

रेल्वे पर्यटन महामंडळ आयआरसीटीसीनं ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारशाला उजाळा देण्यासाठी आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनकार्याचा अनुभव देण्यासाठी 'छत्रपती शिवाजी महाराज सर्किट' या एका विशेष ट्रेनची घोषणा केली आहे. ही यात्रा भारत गौरव टुरिस्ट ट्रेनअंतर्गत 9 जून रोजी मुंबई येथून सुरू होत आहे. या 5 दिवसांच्या विशेष टूरमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनाशी संबंधित महत्त्वाच्या ऐतिहासिक स्थळांना भेट, इतिहासावर आधारित कार्यक्रम असणार आहेत.

## हवामान

हवामान! आज वर्धा, गडचिरोली, अमरावती आणि यवतमाळ जिल्ह्याच्या तुरळक ठिकाणी विजेच्या कडकडाटासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. आज सर्वात जास्त तापमानाची नोंद भंडारा येथे 38 पूर्णांक 6 दशांश अंश सेल्सिअस करण्यात आली आहे. नागपूरचं आजचं तापमान 37 पूर्णांक 9 दशांश अंश सेल्सिअस होते.

******